Page No.
Date :

॥ श्री ॥

# कट्टी बट्टी.

कट्टी बट्टी।

काय मजा असते ना या कट्टी बट्टीची! म्हणजे जेव्हा बालकवळ्या वयात ही गोष्ट घडते, तेव्हा लगेच आपण एकमेकाला मनवत बट्टी करतो. पण जसजसे मोठे होत जातो, मग अहंकार नावाचा एक भोपळा चिकटतो आपल्याला आणि आपण वाट पाहात राहतो कोण माघार घेईल याची आणि या वाट पाहण्यामध्ये कधीतरी खूपच उशीर होतो आणि नाती दुरावत जातात। आणि नंतर ही जाणिव झाल्यावर ही दरी सांधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करावी लागते, तर कधी प्रयत्न न केल्यामुळे नाती जोडल्याच जात नाहीत आणि कायमचा दुरावा निर्माण होतो. असो.

एक या कट्टीबट्टीची घटना आठवली. माझ्या परीच्या लहानपणीची. लहानपणीची।

आमची लेक कधी आजारी पडलेली जास्त आठवत नाही. लहानपणापासूनच एकदम निरोगी आणि गोड, पण एकदा तिला खूपच ताप आली. काहीच खातपित नव्हती. आम्ही तिला दवाखान्यात घेऊन गेलो. डॉ. सांगितले की आज जर तिने काही खाल्ले नाही किंवा दूध घेतले नाही तर ॲडमीट करावे लागेल. आमचे धाबे दणाणले, लेकीच्या काळजीने जिवाची घालमेल व्हायला लागली आणि मग सुरू झाली कसरत तिने दुध तरी द्यावे यासाठी।

माझ्या आजीसासूबाई त्यावेळी आमच्यासोबतच राहायच्या. पणतीवर त्यांचा खूप जीव. मायेने आणि लाडाने त्या तिचे सगळे करायच्या. तेव्हापण आम्ही लेकीला बळजबरी तर कधी नादी लावुन खाऊपिऊ घालण्याचा प्रयत्न करत होतो पण लेक मात्र काही केल्या बधत नव्हती. शेवटी आजीसासूबाईंनी प्रयत्न केला आणि आमच्या कन्येने दुध पिले.

Page No.
Date :

नंतर आम्ही तिला जवळ घेण्याचा प्रयत्न केला तर मॅडम जे रुसून बसल्या की जवळ यायलाच तयार नाही. बहुतेक तिला धास्ती बसली की हे एकतर दवाखान्यामध्ये नेतील नाहीतर खाऊ घालतील. ती काही तिच्या पणजीला सोडायला तयार नव्हती.

नंतर तिच्या बाबांनी पण खूप प्रयत्न केले. तिला खेळवण्याचा प्रयत्न केला, सगळे आमिष दाखवले पण कट्टी काही बट्टीमध्ये रूपांतरित झाली नाही. तीला लहानपणापासून प्राण्यांचे फार वेड. त्यातही त्यावेळी रोज ती गायीला घास खाऊ घातल्याशिवाय जेवायची नाही. घरासमोर रोजच गायी येत असत. मग आमचा तिला घास खाऊ घालून जेवणाचा शाही कार्यक्रम चालत असे.

आमचा हा सगळा गोंधळ चालू असतानाच दारासमोर गायींचा कळप आला. मग आमच्या साहेबांनी तिला सांगितले की "चल आपण हम्माला घास खाऊ घालू." एवढे म्हणायचा अवकाश की लगेच लेक बाबांजवळ गेली आणि गायीला घास खाऊ घातला. अशातऱ्हेने एकदाची बापलेकीची बट्टी झाली.

अशी ही बापलेकीची कट्टीबट्टीची कहाणी.

प्राची पोरे

